# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 51 ) 1st August 2026 ( No. of Pages 08 ) ( No : 08

## MINUTES

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the 28th June, 2026 at***

## *SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOT*

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, 28th June, 2026 at Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Akot

Prof. P.B. Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0479, 0581, 0612, 1122, 1705, 1792, 2038, 2603, 2669, 2720, 2806, 2983, 3020, 3086, 3257, 3341, 3432, 3518, 3550, 3573, 3594, 3631, 3697, 3829, 3835, 3942, 4042, 4045, 4097, 4169, 4189, 4411, 4492, 4498, 4499, 4898, 4914, 4953, 4987, 5149, 5150, 5164, 5189, 5190, 5292, 5341, 5362, 5549, 5550, 5585, 5634, 5668, 5680, 5689, 5733, 5818, 5905, 5906, 5907, 5927, 5930, 5956, 6003, 6119, 6153, 6165, 6169, 6204, 6235, 6269, 6283, 6320, 6347, 6414, 6914.

Signed sheets of papers recording the attendance are included on pages 154 to 158 of and will form part of, the "BOOK OF ATTENDANCE" of General Body meetings.

Agenda of the General Body meeting was circulated on pages 41 to 42 of 2026 NUTA Bulletin.

### ITEM NO. 909 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on SUNDAY, the 16th November, 2025 at Aniket College of Social Work, Station Faeel, Deoli Road,Wardha.

***Notes :- (1)*** *Copy of the minutes was Circulated on pages 337 to 338 of 2025 NUTA Bulletin.*

***(2)*** *Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on* SUNDAY, the 16th November, 2025 at Aniket College of Social Work, Station Faeel, Deoli Road,Wardha *vide No.CIM/57 Dated 15th December, 2025 published on page 347 of 2025 NUTA Bulletin. No correction is received.*

### *विषय क्रमांक ९०९ (१) :*
### *प्रा.बी.टी.देशमुख यांचे दुःखद निधन*

प्रा.बी.टी.देशमुख यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला.** :-

### *नुटाचे अध्वर्यु, शिक्षक चळवळीचे प्रेरणास्थान आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख उपाख्य भाऊ यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव*

प्रा.बी.टी.देशमुख यांचे दिनांक १९ जून २०२६ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक दैदिप्यमान व्यक्तिमत्त्व, शिक्षक चळवळीचे वैचारिक अध्वर्यु, राज्यशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक, अभ्यासू लोकप्रतिनिधी तथा अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार आदरणीय प्रा.भाऊराव तुळशीराम (बी.टी.) देशमुख यांच्या दुःखद निधनाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक युग संपुष्टात आले आहे.

बेलोरा या छोट्याशा गावातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास संघर्ष, अभ्यास, मूल्यनिष्ठा आणि लोकहिताच्या अखंड ध्यासामुळे असामान्य उंचीवर पोहोचला. राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविले, तर लेखक व विचारवंत म्हणून लोकशाही, संविधान आणि संसदीय व्यवस्थेच्या मूल्यांचा प्रसार केला.

महाविद्यालयीन शिक्षकांच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन (NUTA) या संघटनेच्या वैचारिक पायाभरणीत त्यांचे योगदान मोलाचे राहिले. शिक्षकांचे वेतन, सेवाशर्ती, निवृत्तीवेतन, विद्यापीठीय स्वायत्तता आणि उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक चळवळीला अभ्यासपूर्ण दिशा आणि वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाले.

अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघातून सलग पाच वेळा विधान परिषदेत निवडून येत त्यांनी संसदीय लोकशाहीची मूल्ये जपत लोकहिताचे प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडले. संसदीय नियम, प्रक्रिया आणि विधिमंडळीन कामकाजावरील त्यांच्या प्रभुत्वामुळे ते एक उत्कृष्ट संसदपटू म्हणून ओळखले जात होते. विरोधासाठी विरोध न करता विधायक भूमिका घेणे, शासनाच्या चांगल्या निर्णयांचे स्वागत करणे आणि जनहिताच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठविणे ही त्यांची कार्यशैली होती.

विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. विदर्भ व उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष, सिंचन अनुशेष, प्रादेशिक असमतोल, अप्पर वर्धा व गोसेखुर्द यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा पाठपुरावा, ग्रामीण भागातील पाणीप्रश्न आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य इतिहासात कायम स्मरणात राहील. विदर्भाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी केलेली लढाई ही अभ्यासपूर्ण, तथ्याधारित आणि लोकहिताची होती.

सार्वजनिक जीवनात दीर्घकाळ कार्य करूनही त्यांनी साधेपणा, प्रामाणिकपणा आणि चारित्र्यसंपन्नता जपली. पद, प्रतिष्ठा आणि सत्तेच्या मोहापासून दूर राहून त्यांनी लोकप्रतिनिधित्वाला समाजसेवेचे व्रत मानले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ज्ञानाची खोली, नैतिकतेची उंची आणि लोकहिताची निष्ठा यांचा अद्वितीय संगम दिसून येतो.

प्रा.बी.टी.देशमुख यांचे निधन ही शिक्षक चळवळ, शैक्षणिक क्षेत्र, विदर्भ आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाची मोठी हानी आहे. त्यांनी निर्माण केलेली वैचारिक परंपरा, घडविलेली नेतृत्वे आणि लोकहितासाठीचा संघर्षाचा आदर्श पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

"मरावे परी कीर्तिरूपे उरावे" या उक्तीप्रमाणे आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांचे कार्य आणि विचार समाजमनात चिरंतन राहतील. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो व त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य अनुयायांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्राप्त होवो, ही प्रार्थना.

श्रद्धेय बी.टी.देशमुख यांना नुटा परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

### *विषय क्रमांक ९०९ (२) :*
### *प्रा.डॉ.सुशीलकुमार काळमेघ यांचे दुःखद निधन*

प्रा.डॉ.सुशीलकुमार रमेशपंत काळमेघ यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.सौरभ घोगरे यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला.** :-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या संगणकशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.सुशीलकुमार रमेशपंत काळमेघ यांचे दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ५९ व्या वर्षी दुःखद निधन झाले. ते नुटाचे आजीवन सदस्य (क्र.३४९८) होते. ते नुटाचे कार्यकारिणी सदस्य होते तसेच नुटा बुलेटीनचे प्रकाशक होते. संगणकशास्त्र विषयामध्ये ते संशोधक मार्गदर्शक होते. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांचे शोध निबंध प्रकाशित झाले. विद्यापीठाच्या

शैक्षणिक व प्रशासनिक कार्यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. नुटा संघटनेच्या आंदोलनामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

**सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली.** संमत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवितील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

## ITEM NO. 910 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**CONSIDERED AND APPROVED** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2025.

***Notes :*** *(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.02 of 2026) and is now placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report was circulated in this NUTA Bulletin on page 43 to 45.*

*(iii) Dr. Nitin C. Kongre, Secretary presented the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 911 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**APPROVED** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2026.

***Notes : (i)*** *Dr. Nitin C. Kongre, Secretary presented the Budget on behalf of the Executive Committee.*

***(ii)*** *The copy of the Budget was circulated on page No.42 of 2026 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 912 :
## *SUBMISSION OF STATEMENTS OF AUDITED ACCOUNTS*

**NOTED** the submission of statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2025 to The Deputy Charity Commissioner Nagpur region, Nagpur by The Secretary NUTA, DR.NITIN KONGRE vide Acknowledgement No. NGP/171663/TA/25 Date : 26.09.2025.

***Notes :*** *Copy of the Acknowledgement No. NGP/171663/TA/25 Date : 26.09.2025 regarding Submission of Audited Accounts for the year ending on 31st March, 2025 was circulated on page 45 of 2026 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 913 :
## *MEMORANDUM SUBMITTED TO THE 8TH CENTRAL PAY COMMISSION*

**NOTED** Memorandum Submitted to the 8th Central Pay Commission on Common Service matters of Central Government Employees and pensioners by President and General Secretary of AIFUCTO.

***Note :*** *The Memorandum Submitted to the 8th Central Pay Commission on Common Service matters of Central Government Employees and pensioners by President and General Secretary of AIFUCTO was circulated on page 46 of this bulletin.*

## विषय क्रमांक ९१४ :
## *अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक*

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) वतीने दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या नुटा बुलेटीनच्या **"अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांकाची"** नोंद घेण्यात आली. *(सदरहू विशेषांक एकूण ९६ पृष्ठांचा असून सन २०२५ च्या बुलेटीन मालिकेत त्याचे पृष्ठ क्रमांक २४१ ते ३३६ आहेत. सदर विशेषांकाचे वितरण आमसभेमध्ये करण्यात आले. सदरहू विशेषांक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)*

## *विषय क्रमांक ९१५ :*
## *गणसंख्या :*

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

## विषय क्रमांक ९१६ :
## *आभार*

**सभा व्यवस्थेबद्दल आभार** : कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी**
*अध्यक्ष*

स्वा / **डॉ.नितीन कोंगरे**
*सचिव*

**No.CIM/ 58 : : Date 01.08.2026**

### CORRECTION
### in the copy of the Minutes of the General Body Meeting of NUTA

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, 28th June, 2026 at Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Akot is circulated in this NUTA Bulletin. If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to **Dr.Nitin C. Kongre,** Secretary, NUTA, Plot No. 144, Gayatri Nagar, Behind IT Park, Nagpur-440022 by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration. Please send one copy of your letter to Prof. P. B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan Wadi, Rajapeth, Amravati. 444 601.

**- Dr.Nitin C. Kongre,** ***Secretary***

### MUMBAI UNIVERSITY AND COLLEGE RETIRED TEACHERS' WELFARE ASSOCIATION (MUCRTWA) (AFFILIATED TO AIFRUCTO)
### CONDOLENCES

The sudden passing of Prof. B.T. Deshmukh has shocked the entire higher education teaching community in Maharashtra. As a founder member of the Maharashtra Federation of University and College Teachers Organizations (MFUCTO), he dedicated majority of his life to fighting for teachers' rights and improving their living standards. Prof. Deshmukh played a monumental role during the emergency period when MFUCTO was holding a historic battle in the High Court of Mumbai, for the implementation of UGC pay scales. It was because of this struggle that teachers began receiving the benefits startling from the 3rd Pay Scale.

One of his finest qualities was his thoroughness; he never took up an issue without studying it completely and backing it up with solid statistics. These dedications earned him election to the Legislative Council five times. In the State Assembly his speeches were always met with rapt attention from all members.

To educate its members, the Nagpur University Teachers' Association (NUTA) regularly published his speeches and other impornt circulars in the NUTA bulletin. Beyond education, Prof. Deshmukh also made significant contribution to agricultural irrigation, particularly in the Vidarbha region.

We still fondly remember his insistence that members come fully prepared to participate in MFUCTO meetings.

May his soul rest in peace.

**Prin.Dr.Kranti Jejurkar**

# १ नोव्हेंबर २००५ नंतर नेमणूक झालेल्या पण भरती प्रक्रिया त्या तारखेपूर्वी सुरू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा सर्वोच्च निर्णय

- डॉ.प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, नुटा

जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २८ एप्रिल २०२३ रोजी एक महत्त्वपूर्ण निर्णय W.P.No. 2270 of 2021 या प्रकरणात दिलेला आहे. *(113/2023)* **ज्या शिक्षक / कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष नेमणूक ही १ नोव्हेंबर २००५ नंतर झालेली असेल परंतु त्यांची भरती प्रक्रिया ही १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सुरू झालेली असेल त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी लागेल** असे या निर्णयात नमूद आहे. या निर्णयावर आधारित तसाच दुसरा एक निर्णय मा.नागपूर खंडपीठाने दिनांक २८ जून २०२३ *(124/2023)* रोजी तत्सम प्रकरणी दिलेला आहे. **'भरती प्रक्रिया' आणि 'नेमणूक' या दोनमध्ये फरक आहे असे मा.उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे नमूद केलेले आहे.** उपरोक्त न्यायनिर्णयांनी कायद्याचा ठरवून दिलेला अर्थ लक्षात घेता संघटनेने करावयाच्या उपाययोजना निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी ज्यांची भरती प्रक्रिया सुरू झालेली आहे परंतु प्रत्यक्ष नेमणूक मात्र १ नोव्हेंबर २००५ नंतर झालेली आहे अशा सर्व शिक्षक - कर्मचाऱ्यांची बैठक दिनांक १० सप्टेंबर २०२३ रोजी शिक्षक भवन, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती येथे आयोजित करण्यात आलेली होती. बैठकीत अशा शिक्षकांची याचिका उच्च न्यायालयात दाखल करावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर येथे सन २०२४ च्या याचिका क्रमांक ६६९ नुसार दाखल करण्यात आली होती.

१ नोव्हेंबर २००५ नंतर नेमणूक झालेल्या पण भरती प्रक्रिया त्या तारखेपूर्वी सुरू झालेल्या शिक्षक - कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या सन २०२४ च्या याचिका क्रमांक ६६९ चा निकाल दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी या शिक्षकांच्या बाजूने लागला होता. *(149/2025)* तो या अंकात पुन्हा पृष्ठ १२४ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. ६६९ मध्ये दिलेला निर्णय शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**ORDER**

(i) Writ Petition is allowed.

(ii) **It is declared that the petitioners shall be governed by the provisions of Old Pension Scheme** which was in vogue prior to 01/11/2005 and accordingly, necessary steps be taken by the respondents **to accord benefits of Old Pension Scheme to the petitioners within a period of three months.**

(iii) Rule is made absolute in above terms with no order as to costs.

सन २०२४ च्या याचिका क्रमांक ६६९ मध्ये सहभागी असलेल्या याचिकाकर्त्या शिक्षकांची बैठक दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे बोलाविण्यात आलेली होती. या सभेमध्ये याचिकाकर्त्यांनी चर्चा करून निर्णयात दिलेल्या कालावधीनंतर शासनाने निकालाची अंमलबजावणी न केल्यास अवमान याचिका दाखल करण्याबाबतचा निर्णय घेतलेला होता.

मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची कालबद्ध अंमलबजावणी न केल्यामुळे याचिकाकर्त्यांच्या वतीने अवमान याचिका क्रमांक ३९६/२०२५ ही मा.नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल करण्यात आलेली आहे. या अवमान याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयात सुनावणी होत असतानाच राज्यशासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विशेष अनुमती याचिका (SLP (CIVIL) Diary No(s).27856/2026) दाखल करण्यात आली होती.

मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९ मे २०२६ रोजी याबाबत सुनावणी झाली. मा.सर्वोच्च न्यायालयाने जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात शिक्षकांच्या बाजूने सकारात्मक निर्णय दिला. मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेला निर्णय कायम ठेवत राज्यशासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय या अंकात पृष्ठ १२३ वर प्रसृत केलेला आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**ORDER**

1. Delay condoned.

2. We find no grounds to interfere with the impugned judgment and order of the High Court. Hence, the Special Leave Petition is dismissed.

3. Pending application(s), if any, shall stand disposed of.

राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) फेटाळल्यानंतर सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर व अमरावती यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत याचिकाकर्त्यांचे प्रस्ताव दिनांक ०६.०७.२०२६ व ३०.०६.२०२६ च्या पत्रानुसार मागविलेले आहे. हे दोनही पत्रे याच अंकात पृष्ठ १२५ व १२७ प्रसृत केलेले आहेत.

ITEM NO.15 COURT NO.13 SECTION IX

**SUPREME COURT OF INDIA**

Record of Proceedings

**SPECIAL LEAVE PETITION (CIVIL)**
**Diary No(s).27856/2026**

[Arising out of impugned final judgment and order dated 13-08-2025 in WP No.669/2024 passed by the High Court of Judicature at Bombay at Nagpur]

**THE STATE OF MAHARASHTRA & ORS.Petitioner(s)**
**VERSUS**
**RAJESH DNYANESHWAR MIRGE & ORS.**
**Respondent(s)**

IA No. 165195/2026 - CONDONATION OF DELAY IN FILING IA No. 165196/2026 - EXEMPTION FROM FILING C/C OF THE IMPUGNED JUDGMENT IA No. 165197/2026 - EXEMPTION FROM FILING O.T.

**Date : 29-05-2026**

This matter was called on for hearing today.

**CORAM**
**HON'BLE MR. JUSTICE ARAVIND KUMAR**
**HON'BLE MR. JUSTICE PRASANNA B. VARALE**

**For Petitioner(s) :** Mr. Shyam Mehta, Sr. Adv.* Mr. Aditya Krishna, Adv.* Mr. Siddharth Dharmadhikari, Adv.* Mr. Aaditya Aniruddha Pande, AOR* Mr. Shrirang B. Varma, Adv.* **For Respondent(s) :**

UPON hearing the counsel the Court made the following

**ORDER**

**1.** Delay condoned.

**2. We find no grounds to interfere with the impugned judgment and order of the High Court. Hence, the Special Leave Petition is dismissed.**

**3.** Pending application(s), if any, shall stand disposed of.

(NEHA GUPTA)
COURT MASTER (SH)

(AVGV RAMU)
COURT MASTER (NSH)

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, NAGPUR.

# WRIT PETITION NO.669 OF 2024

**PETITIONERS : (1)** Dr. Rajesh Dnyaneshwar Mirge and 27 others.

**VERSUS**

**RESPONDENTS : (1)** The State of Maharashtra, Through its Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai-440032. **(2)** The Director of Higher Education, State of Maharashtra, Central Building, Pune-01. **(3)** The Joint Director of Higher Education, Amravati Division, Amravati. **(4)** The Joint Director of Higher Education, Nagpur Division, Nagpur.

Shri A. I. Sheikh, Advocate for petitioners. Shri A. S. Fulzele, Additional Government Pleader for respondent Nos.1 to 4.

## CORAM: SMT. M. S. JAWALKAR AND PRAVIN S. PATIL, JJ.

## DATE : 13/08/2025.

### ORAL JUDGMENT

### (PER : PRAVIN S. PATIL, J.)

**1.** Rule. Rule made returnable forthwith. By consent of learned Counsel for the parties, the matter is taken up for final disposal.

**2.** By this petition, the prayer is made by the petitioners to declare that the petitioners are governed by the provisions of Old Pension Scheme and their services shall not be governed by the provisions of New Defined Contributory Pension Scheme (DCPS) introduced by the Government Resolution dated 31/10/2005.

**3.** It is undisputed fact that in the present petition, petitioners are working as a full time approved lecturers and serving at Aided Colleges, which are Affiliated to the NonAgricultural Universities.

**4.** Petitioners to substantiate their submission that the recruitment exercise was initiated before cut off date prescribed in Government Resolution dated 31/10/2005, provided the details of date of advertisement and date of appointment are as under :-

(Sr.No.) Name of Teacher (Date of Advertisement) Date of Appointment order

(1) Dr. Rajesh D. Mirge (20/10/2005) 10/02/2006

(2) Dr. Yogita S. Thakare (20/10/2005) 13/02/2006

(3) Dr. Hemant Prabhakarrao Sapkal (20/10/2005) 23/03/2006

(4) Dr. Ananda B. Kale (20/10/2005) 08/02/2006

(5) Dr. M. R. Belkhedkar (20/10/2005) 08/02/2006

(6) Dr. Sharyu M. Thorat (Ku. S. K. Deshmukh) (20/10/2005) 08/02/2006

(7) Dr. G. W. Belsare (20/10/2005) 10/02/2006

(8) Dr. Ganpat D. Deshmukh (20/10/2005) 20/02/2006

(9) Dr. Rajesh P. Ganorkar (20/10/2005) 22/03/2006

(10) Dr. Sunil R. Kondakar (20/10/2005) 10/02/2006

(11) Prof. Madhuri R. Umekar (20/10/2005) 10/02/2006

(12) Dr. Punam V. Barabdhe (20/10/2005) 10/02/2006

(13) Prof. Sarika D. Pachraut (20/10/2005) 10/02/2006

(14) Dr. Nandkishor S. Gopakar (20/10/2005) 22/03/2006

(15) Dr. Santosh N. Patole (20/10/2005) 10/02/2006

(16) Dr. Manisha M. Kodape (20/10/2005) 13/02/2006

(17) Dr. Anil R. Somavanshi (20/10/2005) 23/02/2006

(18) Dr. Jyotsna S. Pusate (20/10/2005) 13/02/2006

(19) Dr. Avinash S. Dhobe (30/06/2005) 19/11/2005

(20) Dr. Kalpana N. Pawar (20/10/2005) 16/02/2006

(21) Dr. V. A. Kodape (20/10/2005) 13/02/2006

(22) Dr. Atul B. Sahare (20/10/2005) 28/03/2006

(23) Dr. R. S. Dhande (20/10/2005) 17/02/2006

(24) Dr. Sanjay J. Aglawe (20/10/2005) 13/02/2006

(25) Dr. Manisha S. Yadav (04/10/2005) 25/01/2006

(26) Dr. Kishor M. Taksande (28/09/2005) 01/12/2005

(27) Dr. Anant M. Awati (20/09/2005)14/11/2005

(28) Prof. Sandip B. Jagtap (20/09/2005) 14/11/2005

**5.** In view of above, it is the submission of petitioners that they are entitled for benefit of old pension scheme in terms of subsequent Government Resolution dated 02/02/2024 wherein it is made clear that the recruitment exercise initiated before cut off date and appointed subsequently are entitled for old pension scheme. Hence, to seek the declaration as stated above, the present petition came to be filed.

**6.** Per contra, learned Additional Government Pleader has strongly opposed the petition by stating that the policy framed by the Government is not applicable to the University teachers as they do not fall in the definition of "Government Servants" and accordingly, it is his submission that the policy framed by the State Government is not applicable to them.

**7.** It is further stated that the advertisement, selection process, approval and the appointment of the petitioners are not the subject of answering respondent. The entire process is within the competence of management / society of the petitioners and therefore, considering the fact that the appointments were made by the respective management / society, Higher and Technical Education Department cannot be held responsible in the matter and accordingly, DCPS scheme cannot be made applicable to the petitioners.

**8.** We have heard learned counsel for the parties and considered the documents placed on record. **It is clear from the Government Resolution dated 31/10/2005 that same would be applicable to the employees who are recruited on or after 01/11/2005 in the service of the Recognized and Aided Educational Institutions,** Non-Agricultural Universities and Affiliated Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. Hence, considering the policy framed by the State Government, it is clear that the same was made applicable to the employees of Non-Agricultural Universities. Therefore, objection raised by Respondent is not sustainable in the eyes of law.

**9.** In the present petition, the Government Resolution dated 02/02/2024 is produced on record. Accordingly, **Government itself clarified that if the recruitment exercise is started before the cut off date i.e. 01/11/2005, and employees were appointed, thereafter in pursuance of that recruitment exercise, will be entitled for the benefit of Old Pension Scheme.**

**10.** Furthermore, this Court in Writ Petition No.3715/2022 has dealt with the identical issue and recorded the findings in Para Nos.7 and 8 which are reproduced as under :-

*"7. The issue is not res integra. The Principal Bench of this Court in the case of Khilari Rajendra Eknath and others v. The State of Maharashtra and others in Writ Petition No.2270 of 2021 has already dealt with this issue and it will be advantageous to reproduce paragraphs 27 and 28 of the said judgment, which read thus -*

*"27. Sub-Rule (2) of Rule 2 of the M.C.S.(Pension) Rules, 1982 states that these rules would not apply to the Government Servants who are recruited on or after 01.11.2005. Rules 1982 are the beneficial piece of legislation governing the post retiral benefits to a government employee. It has been held time and again that pension is not a bounty. Rules 1982 are not made applicable to the government servants who are recruited on or after 01.11.2005. Though the amendment to the Rules 1982 by the State Government are based upon the amendment carried out in the Central Civil Services (Pension) Rules, 1972 there is a subtle difference between the two. The Central Civil Services (Pension) Rules, 1972 apply to the Government Servants appointed on or before 31.12.2003 meaning thereby that it would not apply to the government servants appointed on or after 1st day of January, 2004. Whereas under the said M.C.S. (Pension) Rules, 1982, the wordings are 'the Rules shall not apply to government servants who are recruited on or after 01.11.2005'. The phraseology "Recruitment" and "Appointment" are not synonymous. There is a marked distinction between "Recruitment" and "Appointment". Recruitment is a stage prior to appointment. Recruitment is the process which entails selection of candidates. Selection is a process of picking the candidates from the short listed candidates. An appointment means an actual act of posting a person to a particular office.*

*8. Thus, as per Pension Rules, Old Pension Scheme would not apply to the persons whose recruitment process had commenced after 01/11/2005, meaning thereby the Old Pension Scheme shall apply to the persons, who are recruited in the government services prior to 01/11/2005. Appointment does not mean recruitment. Recruitment entails selection process. In the present petitions though the appointments were made after 01/11/2005, the selection process started prior to 01/11/2005 by publishing the advertisement. Admittedly, the advertisements in this batch of petitions were issued prior to 01/11/2005, however, the appointment orders of the petitioners were issued after cutoff date i.e. 01/11/2005 on which date DCPS is made applicable to all government servant as per GR dated 31/10/2005 and Pension Rules. Therefore, the petitioners shall be entitled to be governed by the Old Pension Scheme and General Provident Fund Scheme which were in vogue prior to 01/11/2005. Resultantly, the petitions succeeded."*

**11.** In view of above, we are of the view that the petitioners are entitled to get the benefit of Old Pension Scheme as their recruitment was started before the cut off date issued by the Government Resolution as indicated in the abovementioned chart. Accordingly, we pass following order :-

**ORDER**

(i) Writ Petition is allowed.

(ii) **It is declared that the petitioners shall be governed by the provisions of Old Pension Scheme** which was in vogue prior to 01/11/2005 and accordingly, necessary steps be taken by the respondents **to accord benefits of Old Pension Scheme to the petitioners within a period of three months.**

(iii) Rule is made absolute in above terms with no order as to costs.

**(PRAVIN S. PATIL, J.)** **(SMT.M.S.JAWALKAR, J.)**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर**

जुने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी, नागपूर

(दुरध्वनी क्र. ०७१२-२५६१७१३ फॅक्स क्र. ०७१२-२५५४२१०)

Website : www.jdnagpur.in Email : jdhengp@rediffmail.com

न्यायालयीन प्रकरण/अतितात्काळ/स्पीड पोस्ट

क्र.उशिनाग/न्या.प्र./२९०७४९९/२६

**दिनांक : ०३/०६.०७.२०२६**

प्रति,

(१) प्राचार्य, शिवाजी विज्ञान महाविद्यालय पवनी, जि.भंडारा (२) प्राचार्य, शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**विषय :** रिट याचिका क्र. ६६९/२०२४ (अवमान याचिका क्र.३९६/२०२५) डॉ.राजेश ज्ञा.मिर्गे व इतर विरुद्ध महा.शासन व इतर.

**संदर्भ :** (१) मा.उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १३.०८.२०२५ (२) अवमान याचिका क्र. ३६९/२०२५ मधील आदेश दिनांक ११.१२.२०२६ व २१.०४.२०२६ (३) शासन पत्र क्र.न्यायाप्र-२०२४/ई.क्र८७६५४९/मशि-६, दिनांक ३०.०६.२०२६ (४) वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, दिनांक ०२.०२.२०२४ (५) वित्त विभाग परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१८/सेवा-४, दिनांक ०२.०५.२०२४

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, याचिकाकर्ता यांची अनुदानित महाविद्यालयातील अध्यापक पदाकरिता दिनांक ०१.११.२००५ पूर्वी पदभरतीची जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या तथापि दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणेबाबत मागणी केलेली आहे.

२. विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दिनांक १३.०८.२०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश देऊन याचिका निकाली काढलेली आहे. :-

"(i) Writ Petition is allowed.

(ii) It is declared that the petitioners shall be governed by the provisions of Old Pension Scheme which was in vogue prior to 01/11/2005 and accordingly, necessary steps be taken by the respondents to accord benefits of Old Pension Scheme to the petitioners within a period of three months.

(iii) Rule is made absolute in terms with no to costs."

उक्त मा.उच्च न्यायालयाचे आदेशा विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय येथे विशेष अनुमती याचिका (डायरी) क्रमांक २७८५६/२०२६ दाखल करण्यात आलेली होती. सदरील विशेष अनुमती याचिका दिनांक २९.०५.२०२६ रोजी फेटाळण्यात आलेली आहे.

३. रिट याचिका क्र. ६६९/२०२४ (डॉ.राजेश डी.मिर्गे व इतर) मधील आदेश दिनांक १३.०८.२०२५ अनुपालन करण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन वित्त विभागाचे शासननिर्णय दिनांक ०२.०२.२०२४ व परिपत्रक दिनांक ०२.०५.२०२४ च्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव या कार्यालयास पुढील कार्यवाही करीता सादर करण्यात यावा.

**(डॉ.संतोष चव्हाण)**

सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

# नुटाच्या नेतृत्वाखाली जुन्या पेन्शन योजनेसाठीचा ऐतिहासिक न्यायालयीन लढा :- "संघर्ष, न्याय आणि विजयाची गाथा"

- डॉ.राजेश मिरगे, याचिकाकर्ता, अमरावती

जुनी पेन्शन योजना (Old Pension Scheme) ही केवळ निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षितता प्रदान करणारी योजना नसून ती कर्मचाऱ्यांच्या सामाजिक सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याच्या घटनात्मक अधिकाऱ्यांशी निगडित बाब आहे. भारतामध्ये १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत दाखल होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन योजना (Define Contribution Pension Scheme) NPS एनपीएस लागू करण्यात आली. तथापि, संक्रमण काळात विविध विभागामध्ये भरती प्रक्रिया व नियुक्ती आदेशाने सेवेत रुजू होण्याच्या तारखांमधील विसंगतीमुळे अनेक कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला. महाराष्ट्रातील अनुदानित महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेले अनेक प्राध्यापकांची निवड/नियुक्ती प्रक्रिया आणि शासन मान्यता १ नोव्हेंबर २००५ पूर्वीची असतानाही त्यांना नवीन पेन्शन योजना समाविष्ट करण्यात आले. परिणामी समान परिस्थितीतील शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू झाली परंतु महाविद्यालयीन प्राध्यापकांना त्यापासून वंचित ठेवण्यात आले. या भेदभावाविरोधात नागपूर युनिव्हर्सिटी टीचर असोसिएशन अर्थात नुटाने उभारलेला हा लढा शिक्षक क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण न्यायालयीन संघर्ष ठरला .

**संघर्षाची पार्श्वभूमी**

शिक्षक संघटनांचे ज्येष्ठ नेते आणि लोकनेते स्वर्गीय बी.टी. भाऊ देशमुख यांनी अनेक वर्षे शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला. बी.टी. भाऊ हे सामाजिक न्याय, लोकशाही मूल्य आणि शिक्षण क्षेत्रातील समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांच्या सेवाशर्ती, वेतन आयोग, पदोन्नती, निवृत्तीवेतन शैक्षणिक स्वायत्तता या विषयावर प्रभावी चळवळी उभ्या राहिल्या. त्यासाठी त्यांनी गेल्या पाच दशकापासून प्रदीर्घकाळ संघर्ष लढा केला. आपल्या विधिमंडळाच्या तीस वर्षाच्या कारकिर्दीत शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय वाचा फोडण्याचे त्यांनी कार्य केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या जुन्या पेन्शनच्या प्रश्नांमध्ये घटनात्मक आणि कायदेशीर पैलूंचा सखोल अभ्यास करून संघटनेला स्पष्ट दिशा दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नुटा अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित कागदपत्रे, शासन निर्णय, न्यायालयीन निर्णय आणि सेवाविषयक नोंद याचा अभ्यास करून लढ्याची पायाभरणी उभी केली. शिक्षक संघटनेची खरी ताकद केवळ आंदोलनात नसते तर योग्य वेळी, योग्य कायदेशीर लढा उभारण्यात असते याचे उदाहरण या संघर्षाने घालून दिले.

**याचिका दाखल करण्यामागील कायदेशीर आधार**

दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी राजेश ज्ञानेश्वर मिरगे आणि इतर २७ प्राध्यापकांनी माननीय उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात येथे याचिका क्रमांक ६६९ दाखल केली. याचिका कर्त्यांचा मुख्यत पुढील तत्त्वावर आधारित होता.

(१) भारतीय राज्यघटनेचे कलम १४ समानतेचा अधिकार समान परिस्थितीत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करता येत नाही. शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करून महाविद्यालयीन प्राध्यापकांना त्यापासून वंचित ठेवणे हे समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे.

(२) कलम १६ यानुसार सार्वजनिक नोकरीतील समान संधी, सेवाशर्ती मध्ये न्याय व समान वागणूक मिळणे हा कर्मचाऱ्यांचा मूलभूत अधिकार आहे

(३) वैध अपेक्षेचा सिद्धांत (doctrine of legitimate expectation) नियुक्ती प्रक्रिया जुनी पेन्शन योजना अस्तित्वात असताना पूर्ण झालेली असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनचा वैध हक्क निर्माण होतो.

(४) प्रशासकीय न्याय (administrative fairness)

शासनाच्या विलंबामुळे किंवा प्रशासकीय प्रक्रियेतील त्रुटीमुळे कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ शकत नाही.

(५) नैसर्गिक न्यायाचे तत्व (principles of natural justice)

कर्मचाऱ्यांच्या अधिकारावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या निर्णय घेताना न्याय निकष लागू होणे आवश्यक आहे.

न्यायालयीन सुनावणी आणि युक्तिवाद याचिकाकर्त्या तर्फे सुप्रसिद्ध वरिष्ठ वकील ॲड.फिरदोस मिर्झा यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड.अशफाक शेख यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयासमोर स्पष्ट केले की, संबंधित प्राध्यापकांच्या नियुक्ती प्रक्रियेचा मूळ आधार आणि त्यांचे सेवा अधिकार हे १ नोव्हेंबर २००५ पूर्वीचे आहेत. त्यामुळे त्यांना नवीन पेन्शन योजनेत ढकलणे अन्यायकारक आणि कायद्याच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. सुनावणी दरम्यान विविध शासन निर्णय, नियुक्ती आदेश, निवड प्रक्रिया, पूर्वीचे न्यायालयीन निर्णय आणि घटनात्मक तरतुदी न्यायालयासमोर सादर करण्यात आल्या.

**उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय**

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला. न्यायालयाने शासनाला तीन महिन्याच्या आत संबंधित २८ प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे पुढील महत्त्वाची तत्त्वे अधोरेखित झाली.

(१) प्रशासकीय विलंबाचा फटका कर्मचाऱ्यांना बसू शकत नाही.

(२) समान परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्यांचा मध्ये भेदभाव करता येत नाही.

निवृत्ती वेतन हा केवळ आर्थिक लाभ नसून सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे.

(३) शासनाने न्यायालयीन आदेशाची वेळेत अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचे आदेशानंतर शासनाने अपेक्षित कारवाई केली नाही. यापूर्वी १४ सप्टेंबर २०२५ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई, संचालक उच्च शिक्षण पुणे आणि उच्च शिक्षण सहसंचालक अमरावती व नागपूर या विभागांना याचिकाकर्त्यांनी लेखी निवेदन देऊन आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली होती. तथापि कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने परिणामतः डिसेंबर २५ मध्ये अवमान याचिका मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. ही कारवाई न्यायालय आदेशाच्या पालन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ठरली.

---

*राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्यशासनाच्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी द्यावयाच्या विकल्पास मुदतवाढ देण्याबाबत*

**महाराष्ट्र शासन : वित्त विभाग**

शासन निर्णय क्रमांक : सेनिवे २०२४/प्र.क्र.५४/सेवा-४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : ३०.०३.२०२६**

**वाचा :** (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दि. २०.०९.२०२४

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दि. २८.०३.२०२५

**शासननिर्णय**

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्यशासनाच्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी दि. ३१.०३.२०२६ पर्यंत विकल्प देण्याच्या सूचना संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. आता सदर विकल्प सादर करण्यासाठी दि. ३१.१२.२०२६ पर्यंत सुधारित मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३३०१२१८०५३७०५ असा आहे. हा शासननिर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(मनिषा कामटे)**
शासनाचे उपसचिव

**सर्वोच्च न्यायालयातील अंतिम लढा**

अवमान याचिकेच्या प्रक्रिया दरम्यान शासनाने याचिकाकर्त्यांना जुनी पेन्शन योजना लाभ देण्याच्या संदर्भात आम्ही सकारात्मक आहोत असे सांगितले. त्याचवेळी महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP Diary No. 27856/2026) दाखल केली. मात्र दि. २९ मे २०२६ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने शासनाची याचिका फेटाळून लावली. परिणामी माननीय उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचा निर्णय कायम राहिला आणि संबंधित प्राध्यापकांच्या जुन्या पेन्शनच्या अधिकाराला सर्वोच्च न्यायालयाची मान्यता प्राप्त झाली. या निर्णयामुळे पुढील बाबीवर शिक्कामोर्तब झाले.

उच्च न्यायालयाच्या निर्णय कायदेशीर दृष्ट्या योग्य असून संबंधित प्राध्यापकांच्या जुनी पेन्शन योजनेवरचा दावा न्याय आहे. शासनाने आदेशाची अंमलबजावणी करण्यास विलंब करू नये व समान प्रकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा न्यायनिर्देशक ठरू शकतो. सदर जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भातला अधिकार बहाल करण्याच्या बाबतीतला भारतातला हा महाविद्यालयीन शिक्षकांचा पहिला निर्णय आहे. नुटा संघटनेचे योगदान या संपूर्ण संघर्षात संघटनात्मक नेतृत्वच केले नाही तर कायदेशीर, प्रशासकीय आणि नैतिक आधारही उपलब्ध करून दिला. विशेषतः स्वर्गीय बी.टी.देशमुख यांचे मार्गदर्शन, डॉ.प्रवीण रघुवंशी यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, याचिकाकर्त्यांची एकजूट, ॲड. फिरदोस मिर्झा व ॲड.अशफाक शेख यांच्या प्रभावी न्यायालयीन नेतृत्व, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न या सर्व घटकांमुळे हा ऐतिहासिक विजय शक्य झाला.

सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर अमरावती व नागपूर विभागाच्या उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाने २८ याचिकाकर्त्यांचे प्रस्ताव सादर करण्यासंबंधीचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर दि.११ जुलै २०२६ रोजी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे नुटा संघटनेचे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी यांच्या नेतृत्वात महत्त्वाची सभा झाली. सदर सभेत नुटाचे पदाधिकारी डॉ.रवींद्र मुंद्रे, प्राचार्य डॉ.नितीन चांगोले, प्राचार्य डॉ.महेंद्र मेटे, डॉ.प्रकाश तायडे, डॉ.विलास ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर सभेत सर्वोच्च न्यायालयातील या ऐतिहासिक जुन्या पेन्शनच्या लढ्याला आलेले यश आणि त्यातील आदरणीय बी.टी. भाऊंचे मार्गदर्शन, त्यांची दृष्टी व संघटनेचे बळ यासंदर्भात विश्लेषण करण्यात आले. डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी दोन वर्ष पाच महिन्याच्या या ऐतिहासिक संघर्षाच्या काळातील अनेक दस्तऐवज, संदर्भांचे विश्लेषण करीत दिवंगत बी.टी. भाऊ देशमुख यांच्या पाठबळामुळे, संविधानिक कायदेशीर मार्गदर्शन यामुळे आपण यशस्वी झाल्याचे विचार व्यक्त केले. पुढील काळात भारतातील महाविद्यालयीन प्राध्यापकांना सदर जुन्या पेन्शन योजनेच्या या लढ्याला आलेले यश त्यांना नक्कीच दिशादिग्दर्शित करेल असा सार्थ विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी याचिका कर्त्यांमध्ये डॉ.राजेश मिरगे, डॉ.आनंद काळे, डॉ.रवी धांडे, डॉ.अविनाश धोबे यांनी आदरणीय बी.टी. भाऊ देशमुख, नुटा संघटनेचे ऋण व्यक्त केले.

महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या जुन्या पेन्शन योजनेसाठी लढलेला हा संघर्ष भारतीय न्यायव्यवस्था, शिक्षक संघटनांची एकजूट आणि घटनात्मक मूल्यावरील विश्वास यांचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हा विजय केवळ २८ प्राध्यापकांचा नसून शिक्षण क्षेत्रातील सर्व कर्मचाऱ्यांच्या हक्काचा संरक्षणाचा विजय आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय भविष्यात १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या सेवा संदर्भातील इतर कर्मचाऱ्यांसाठी ही मार्गदर्शक ठरण्याची शक्यता आहे. सामाजिक सुरक्षा, समानता आणि न्याय या राज्यघटनात्मक मूल्यांच्या विजयाचे एक नवे पर्व ऐतिहासिक उदाहरण म्हणून भारतीय शिक्षण क्षेत्राच्या इतिहासात कायम स्मरणात राहील असा सार्थ विश्वास वाटतो.

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परीसर, कठोरा रोड, अमरावती-४४४६०४

Web : jdheamravati.in Email : jdheamt@yahoo.com

JDAMY-NGCoANU (AMT)/297/1262348

**दिनांक : ३०.०६.२०२६**

प्रति,

प्राचार्य, (यादी प्रमाणे)

**विषय :** रिट याचिका क्र. ६६९/२०२४ (अवमान याचिका क्र.३९६/२०२५) डॉ.राजेश ज्ञा.मिर्गे व इतर विरुद्ध महा.शासन व इतर मधील आदेश दिनांक १४.०८.२०२५ रोजीच्या आदेशा विरोधात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याबाबत.

**संदर्भ :** (१) मा.उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १३.०८.२०२५

(२) अवमान याचिका क्र. ३६९/२०२५ मधील आदेश दिनांक ११.१२.२०२६ व दिनांक २१.०४.२०२६

(३) शासन पत्र क्र.न्यायाप्र-२०२४/ई.क्र८७६५४९/मशि-६, दिनांक ३०.०६.२०२६

(४) वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, दिनांक ०२.०२.२०२४

(५) वित्त विभाग परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१८/सेवा-४, दिनांक ०२.०५.२०२४

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, याचिकाकर्ता यांची अनुदानित महाविद्यालयातील अध्यापक पदाकरिता दिनांक ०१.११.२००५ पूर्वी पदभरतीची जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या तथापि दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणेबाबत मागणी केलेली आहे.

२. विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दिनांक १३.०८.२०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश देऊन याचिका निकाली काढलेली आहे. :-

"(i) Writ Petition is allowed.

(ii) It is declared that the petitioners shall be governed by the provisions of Old Pension Scheme which was in vogue prior to 01/11/2005 and accordingly, necessary steps be taken by the respondents to accord benefits of Old Pension Scheme to the petitioners within a period of three months.

(iii) Rule is made absolute in terms with no to costs."

उक्त मा.उच्च न्यायालयाचे आदेश विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय येथे विशेष अनुमती याचिका (डायरी) क्रमांक २७८५६/२०२६ दाखल करण्यात आलेली होती. सदरील विशेष अनुमती याचिका दिनांक २९.०५.२०२६ रोजी फेटाळण्यात आलेली आहे.

३. रिट याचिका क्र. ६६९/२०२४ (डॉ.राजेश डी.मिर्गे व इतर) मधील आदेश दिनांक १३.०८.२०२५ अनुपालन करण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन वित्त विभागाचे शासननिर्णय दिनांक ०२.०२.२०२४ व परिपत्रक दिनांक ०२.०५.२०२४ च्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव या कार्यालयास पुढील कार्यवाही करीता सादर करण्यात यावा.

**(डॉ.अभय खांबोरकर)**<br>
सहसंचालक, उच्च शिक्षण,<br>
अमरावती विभाग, अमरावती

**प्रत :** (१) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

(२) मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, शिवाजी नगर, पुणे-४११०१६ यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

(३) प्रशासन अधिकारी, मुख्य लिपीक, वेतन पथक विभाग यांना/माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित (यादीसह)

(४) संबंधित कर्मचारी (याचिकाकर्ता यादी प्रमाणे)

# *GOLDEN JUBILEE CELEBRATIONS*

With a view to celebrate Golden Jubilee of NUTA BULLETIN a function will be held on

**Sunday,**
**the 23rd August, 2026**
**at 11.00 a.m.**

**VENUE**
**Dr.K.G.Deshmukh Sabhagruha,**
**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**

**PROF. ASOK BARMAN**

The Ex-General Secretary of AIFUCTO will deliver Golden Jubilee address

**DR.MILIND BARHATE**

Hon'ble Vice-Chancellor, Sant Gadge Baba Amravati University, Amravati

**SHRI. FIRDOS MIRZA**

Senior Counsel, Bombay High Court
will grace the function.

This function will be presided over by

**PROF. S.P.LAWANDE**

Ex-President of MFUCTO

**All are requested to attend the function.**

**Prof. P.B. Raghuwanshi**
President

**Dr.Nitin C. Kongre**
Secretary

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 26.07.2026) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.08.2026**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,.........................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................